# नियमित दिवाणी दावा क्र.१५२/२०२५ मधील निशाण क्र.२२ खालील आदेश

[ CNR No.MHKO090004892025 ]

प्रस्तुतचा अर्ज वादीतर्फे दि.१४.०८.२०२५ रोजी नि.५ वर पारीत केलेला आदेश पुढील तारखेपर्यंत वाढविणेत यावा, याकरिता सादर केला आहे. प्रस्तुतच्या प्रकरणात प्रतिवादीतर्फे आजरोजी म्हणणे सादर करणेत आले आहे. वादी व वादींच्या विधीज्ञांचा पुकारा केला असता दोन्हीही गैरहजर. प्रतिवादीमार्फत सादर केलेले दस्तऐवज बघता त्यामध्ये वादग्रस्त जमिनीबाबत वादी यांच्याविरुध्द वन अपराध दि.११.०८.२०२५ रोजी नोंदविल्याचे दिसते. अशा परिस्थितीत, वादी यांनी आपली बाजु मांडणेकरिता आजरोजी न्यायालयासमक्ष हजर असणे अभिप्रेत होते. तथापि, वादी यांना दि.१४.०८.२०२५ रोजी देण्यात आलेला अंतरिम आदेश यामध्ये प्रस्तुतचे प्रकरण चालविण्यास वादी दिरंगाई करत असल्याचे दिसते. त्यामुळे अशा परिस्थितीत, अंतरिम आदेश पुढील तारखेपर्यंत वाढवणेचा असलेस तो विशिष्ट अटीसह मंजूर करणे न्यायसंगत ठरेल. सबब मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करत आहे :-

## आदेश

१] दि.१४.०८.२०२५ रोजीचा आदेश केवळ पुढील तारखेपर्यंत वाढविणेत येत आहे.

२] वादीने पुढील तारखेस नि.५ चे अर्जावर युक्तिवाद सादर न केलेस दि.१४.०८.२०२५ रोजीचा आदेश खंडीत (vacate) करणेत येईल.

Digitally signed by NARENDRA
Date: 2025.08.26 11:20:01 +0530

( न. श्री. पुरी )
दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर, गडहिंग्लज

स्थळ : गडहिंग्लज.
दिनांक : २५.०८.२०२५.